अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

## नोकरीचे आमिष दाखवून पावणे सहा लाखांना गंडा

**सोलापूर :** नोकरीचे आमिष दाखवून पाच लाख ७० हजार रुपयांची फसवणूक झाल्याची घटना उघडकीस आली आहे. ही घटना दि.१६ ते १७ नोव्हेंबर दरम्यान घडली. याप्रकरणी सनाउल्ला मुजम्मिल सय्यद (वय-३२, रा. आयेशा टॉवर तेलंगी पाच्छा पेठ) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून ७००५०८५३०३ व ९३१९११२०२६ या मोबाईल क्रमांकाच्या धारकांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

फिर्यादी यांच्या मोबाईलवर जॉब पाहिजे का असा मेसेज आला. त्यानंतर फिर्यादी यांना जॉबची आवश्यकता असल्याने त्यांनी हो असे सांगितले.त्यानंतर त्यांना ऑनलाईन, व्हॉट्स ॲप व टेलिग्राम वरून इंस्टाग्रामवर सांगितले.



अकाउंट धारकांच्या फॉलोवर वाढविण्याचे www.cayprobe.cc या वेबसाईटवर ट्रेंडिंग करून कमिशन मिळवण्याचे काम असल्याचे आलेल्या मोबाईल धारकांनी सांगितले. त्यांनी दिलेल्या विविध अकाऊंटवर पैसे जमा करावे लागतील असे सांगून फिर्यादी सय्यद यांनी वरील संशयित मोबाईल धारकांनी दिलेल्या विविध बँक अकाउंटवर पैसे जमा करावे लागतील असे सांगून, फिर्यादी यांनी वेळोवेळी एकूण पाच लाख सत्तर हजार रुपये जमा करून दिलेला जॉब पूर्ण केला. त्यानंतर फिर्यादी सय्यद यांनी केलेल्या कामाचा मोबदला व भरलेली मुद्दल रक्कम परत मागितली असता, ती रक्कम फिर्यादी यांना परत न करता तुम्हाला पुढील टास्कसाठी ४ लाख ४८ हजार रुपये भरावे लागतील, नाहीतर तुम्हाला तुमचे कमिशन व मुद्दल रक्कम मिळणार नाही असे सांगून फिर्यादी यांची फसवणूक केली आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक करणकोट हे करीत आहेत.

www.surajyadigital.com | बुधवार दि. २३ नोव्हेंबर २०२२ | वर्ष : २१ वे | अंक : ५७ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

# 'सेक्सस्टॉर्शन'च्या विळख्याचा लागला छडा; राजस्थानातील गावाचा भरला पापाचा घडा

सुराज्य/पुणे

**साऱ्या महाराष्ट्रात सांस्कृतिक शहर म्हणून खास ओळख असलेल्या पुणे शहराला सेक्सस्टार्शनचा (छळ, मानसिक त्रास, ब्लॅकमेल) जबरदस्त विळखा पडला आहे. सेक्सस्टार्शनच्या त्रासाला कंटाळून दोन तरूणांनी आत्महत्या केल्यानंतर पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवली. त्यात एक अत्यंत धक्कादायक माहिती समोर आली. राजस्थानमधील एक गाव सेक्स्टॉर्शन रॅकेट चालवत असल्याचे उघड झाले. तरुणांच्या आत्महत्येप्रकरणी पोलिसांनी राजस्थानमधून एका आरोपीला अटक केली. खाक्या दाखवताच त्याने चौकशीदरम्यान ही माहिती दिली. त्याने दिलेल्या माहितीनुसार, राजस्थानचे गुरुगोठडी हे संपूर्ण गाव सेक्स्टॉर्शन रॅकेट चालवत असल्याचे समोर आले आहे.**

पुण्यात दोन युवकांनी सेक्सटॉर्शनमुळे आत्महत्या केली. या दोन्ही प्रकरणामुळे पुण्यातील भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. त्यामुळे पुणे पोलिसांनी सेक्सटॉर्शनच्या रॅकेटचा शोध घेण्यास सुरुवात केली. या तपासात गुरुकोठडी हे राजस्थानच्या अलवर जिल्ह्यातील संपूर्ण गावच सेक्सटॉर्शनचे रॅकेट चालवत असल्याचे उघड झाले आहे. पहिल्यांदा ऑनलाइन ओळख झालेल्या तरुणींचे नग्न फोटो व्हायरल करण्याची धमकी देत खंडणी उकळल्याची घटना उघडकिस आली. त्यानंतर दोन तरुणांकडे न्यूड व्हिडिओ शेअर करण्याची धमकी देत पैशांची मागणी करण्यात आली. या त्रासाला कंटाळून पुण्यात एकाच आठवड्यात सेक्सटॉर्शनचे दोन बळी गेले. काही दिवसांपूर्वी वर्ध्यातील एका डॉक्टरला सेक्सटॉर्शनच्या जाळ्यात ओढून लाखोंची खंडणी उकळली गेली. चंद्रपुरातही असे धक्कादायक प्रकार उघडकिस आले आहेत.

तरुण आणि धनाढ्य व्यक्तींना गाठून फेसबुकवर रिक्वेस्ट पाठवली जाते. या टोळीतल्या तरुणींना अश्लील बोलायला तयार केलेले असते. वेगवेगळ्या नंबरवरून हा व्हिडिओ कॉल केला जातो. ओळख होताच तरुणी नग्न होऊन व्हिडिओ कॉल करते. समोरच्या व्यक्तीलाही कपडे काढायला लावले जातात. ज्याला जाळ्यात ओढायचे. त्याला बोलायला भाग पाडून रेकॉर्डिंग केले जाते आणि त्यानंतर खंडणी मागण्यास सुरुवात होते. खंडणीची रक्कम बनावट खात्यात मागवली जाते, असा धंदा सेक्सस्टॉर्शनमधून केला जातो.

### अख्खे गावच रॅकेट चालवते

झारखंडमधील जमातारा प्रमाणेच राजस्थानमधील गुरुगोठडी गाव फसवणूक आणि सेक्सटॉर्शनचा अड्डा बनल्याचे उघड झाले आहे. या गावातील सगळे गावकरी सोशल मीडियावर बनावट अकाउंट्स तयार करुन त्या माध्यमातून सेक्सटॉर्शनचे रॅकेट चालवत असल्याचे पुणे पोलिसांचे सांगितले. काही दिवसांपूर्वी पुण्यात दोन युवकांनी सेक्सटॉर्शनमुळे आत्महत्या केली. या गावातील अन्वर खानने मुलीच्या नावे बनावट अकाउंट तयार करुन पुण्यातील १९ वर्षांच्या मुलाला सेक्सटॉर्शनच्या जाळ्यात ओढले. काही दिवस विश्वास संपादित केल्यावर त्याला त्याचे अर्धनग्न फोटो आणि व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देऊन ब्लॅकमेल करणे सुरु झाले. अखेर या त्रासाला कंटाळून मुलाने आत्महत्या केली. पुण्यातील धनकवडी भागातील तरुणही असाच सेक्सटॉर्शनचा बळी ठरला. त्यानंतर पुणे पोलिसांनी या सेक्सटॉर्शनचे मूळ शोधायचे ठरवले आणि सेक्सटॉर्शनचा अड्डा असलेले गाव शोधून काढले. हे संपूर्ण गुरुकोठडी गावच सेक्सटॉर्शनच्या धंद्यात असल्याचे आणि गावातील स्त्री-पुरुष असे मिळून एकूण अडीच हजार लोक यात सहभागी असल्याचे पुणे पोलिसांनी सांगितले. अन्वर खानला पुण्यात आणून पुणे पोलिसांनी त्याची चौकशी सुरु केली आहे. या चौकशीतून आणखी नवीन माहिती समोर येणार आहे. पण सेक्सटॉर्शनचे हे प्रकार रोखण्यासाठी आंतरराज्यीय स्तरावर तपास यंत्रणांनी काम करण्याची गरज यातून अधोरेखित झाली आहे.



### जागतिक राजधानी...

देशात रोज सेक्स्टॉर्शनच्या ५०० हून अधिक घटना घडतात. त्यातून जेमतेम अर्धा टक्का घटनांमध्ये तक्रारी दाखल होतात. भारत सेक्स्टॉर्शनची जागतिक राजधानीच झाला आहे,अशी माहिती असून यात सर्वसामान्यांसह आमदार आणि खासदारांनाही अडकवले जात आहे. सेक्सटॉर्शनच्या जाळ्यात अडकल्यानंतर समोरुन पाहिजे तेवढी रक्कम कितीही वेळा मागितली जाते. त्यातून बाहेर पडणे अत्यंत कठीण असल्याचे सांगण्यात येते.

### जिवाची पर्वा न करता पाठलाग केला...

पुण्यात एकाच महिन्यात सेक्सटॉर्शनने दोघांचे बळी घेतले. त्यामुळे सेक्सटॉर्शन नेमके काय असते आणि ते कसे केले जाते आणि हा प्रकार नेमका कोण करत आहे? याचा शोध पुणे पोलिसांनी सुरु केला. मोबाईल नंबरचे लोकेशन शोधले. राजस्थानच्या अलवर जिल्ह्यातील लक्ष्मणगढ तालुक्यातील गुरु कोठडी असे या गावाचे नाव आहे. या गावात पोहचल्यावर पुण्यातील मुलाच्या आत्महत्येस कारण ठरलेला आरोपी अन्वर खान याला ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. यावेळी त्याच्या गावातील पोलिसांनी आणि त्याच्या घरच्यांनी पोलिसांवर दगडफेक केली. पोलिसांनी जीवाची पर्वा न करता आरोपीचा अडीच किलोमीटर पाठलाग केला आणि आरोपीला पकडले. राजस्थानमध्ये अनेक तरुण सेक्सटॉर्शनमार्फत पैशाची मागणी करतात. त्यांनी त्याचे ऑनलाईन प्रशिक्षण देखील घेतल्याचे तपासात उघड झाले आहे.

### थरकाप सुटणारा एक प्रसंग

पुण्यातील दत्तवाडी भागात राहणाऱ्या १९ वर्षीय शंतनू वाडकर याची एका तरूणीशी इन्स्टाग्रामवर ओळख झाली. त्याने तिला अर्धनग्न फोटो पाठवले. याचा गैरफायदा घेत त्या तरुणीने पैसे दे अन्यथा सोशल मीडियावर फोटो व्हायरल करेल, अशी धमकी दिली. या सततच्या त्रासाला कंटाळून वाडकर या तरुणाने इमारतीवरुन उडी मारून आत्महत्या केली. तिच्या मागणीनुसार त्याने ४ हजार ५०० रुपये ऑनलाईन दिले. सतत पैसे मागू लागल्याने त्या त्रासाला कंटाळून शंतनूने २८ सप्टेंबर रोजी दुपारच्या सुमारास राहत्या असलेल्या इमारतीवरुन उडी मारून आत्महत्या केली.


### जबरदस्त रॅकेट

तुम्ही केलेले पहिले पेमेंट ही फक्त सुरूवात असते. तुम्ही एकदा पैसे दिले की- वारंवार खंडणीची मागणी केली जाते. पैसे न दिल्यास तुमचा व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी दिली जाते. व्हॉईस मॉड्युलेशनचा वापर करुनही खंडणी मागितली जाते. गेल्या वर्षी दिल्ली पोलिसांनी राजस्थानमधून चालणाऱ्या रॅकेटच्या मुसक्या आवळल्या होत्या. पण हे रॅकेट एवढे मोठे आहे, की अजूनही खंडणी उकळणे सुरूच आहे. यातून बाहेर कसे पडायचे हे सर्वात मोठे आव्हान आहे. यावर पोलिसांनीही काही गोष्टींची काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. पहिले पेमेंट करण्यापूर्वीच पोलिसांची मदत घ्या. खऱ्या महिलेचा फक्त फोटो टार्गेटला दाखवलेला असतो. व्हिडिओ कॉलमध्ये टार्गेटचा फ्रंट कॅमेरा, तर महिलेचा रिअर कॅमेरा चालू असतो. महिला स्वतः नग्न होत नसते, तर रिअर कॅमेरा चालू आहे हे दाखवून पॉर्न व्हिडिओ चालवले जातात. पण यात टार्गेटचा फ्रंट कॅमेरा चालू ठेवून त्यात समोरच्याला अडकवले जाते.

## चंद्रभागा नदीचे पावित्र्य टिकवण्यासाठी स्वतंत्र आराखडे तयार करा : सीईओ स्वामी

सुराज्य/सोलापूर





ग्रामपंचायत सक्षमीकरण अभियान योजनेअंतर्गत ग्रामीण अंतर्गत नदीकाठच्या १२० गावात सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प राबविण्यात येणार आहे. भीमा नदी स्वच्छ ठेवा, असे भावनिक आवाहन सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी केले.

पंचायत समिती मोहोळच्या वतीने घाटुळे मंगल कार्यालय येथे ग्रामपंचायत सक्षमीकरण अभियान, स्वच्छ भारत मिशन ग्रामीण, जलजीवन मिशन अंतर्गत सरपंच व ग्रामसेवक यांच्यासाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी मार्गदर्शन ते बोलत होते.या कार्यशाळेस उप मुख्य कार्यकारी अधिकारी ईशाधीन शेळकंदे, गटविकास अधिकारी आनंदकुमार मिरगणे, बालविकास प्रकल्प अधिकारी किरण सूर्यवंशी, बांधकामचे उप अभियंता दळवी, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव,घनकचरा सल्लागार मुकुंद आकुडे प्रमुख उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना स्वामी म्हणाले, चंद्रभागेचे पावित्र्य टिकविण्यासाठी सर्वांचा सहभाग महत्त्वाचा आहे. पहिल्या टप्प्यात लोकसंख्येच्या प्रमाणात निधी उपलब्ध तीन देण्यात येत आहे. भीमा, निरा, सीना व माण या चार प्रमुख नदीकाठची गावे आराखड्यात घेण्यात आली आहेत. प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी सार्वजनिक शौचालय देखील देण्यात येणार आहे. यासाठी १५ व्या वित्त आयोगाचे निधीतून तरतूद करा. सांडपाणी व घन कचरा व्यवस्थापन साठी ७० टक्के निधी स्वच्छ भारत मिशन ग्रामीण मधून देण्यात येत आहे, असेही स्वामी यांनी सांगितले.स्वच्छ भारत मिशन अंतर्गत गाव कृती आराखडा तयार करा.

ज्या कुटुंबाना अद्याप शौचालयाचा लाभ देण्यात आला नाही. त्या कुटुंबाकडे शौचालय होण्यासाठी कुटुंबाची नावे द्या. लोकसंख्येनुसार गावाचा कृती आराखडा तयार करा. सेप्टीक टँकमधून बाहेर पडणाऱ्या पाण्यासाठी शौषखड्डा घेणे आवश्यक आहे. असे शेळकंदे यांनी सांगितले. सामूहिक खत खड्डे, ओला कचरा, सुका कचरा, प्लास्टीक यांचे सूक्ष्म नियोजन करा अशा सूचना देऊन या सर्व बाबी ग्रामपंचायत सक्षमीकरण अभियान अंतर्गत घ्या. अभियान प्रभावीपणे राबवा, असे आवाहनही त्यांनी केले.

**चंद्रभागा नदीचे पावित्र्य राखा**

जनावरे धुवू नका. कपडे भांडी, वाहने धुवू नका. जुनी कपडे प्लास्टीक, कचरा टाकू नका. नदीकाठी उघड्यावर शौच विधी करू नका, असे आवाहन स्वामी यांनी केले. जगाच्या कोपऱ्यातून भाविक येतात. चंद्रभागेचे पाणी पवित्र तीर्थ म्हणून घेतात. जुने घाटाचे पुनरूज्जीवन करा. वृक्षारोपण करा. नदीच्या पात्राचे धूर थांबवा. परिसरांत प्लास्टीक संकलन करा. नदीत सांडपाणी जाणार नाही, या दृष्टीने आराखडे तयार करा, असे आवाहनही त्यांनी केले.

## तीन नाही, तर चार वर्षांनी मिळणार ग्रॅज्युएशन डिग्री; युजीसीचे नवे नियम

**नवी दिल्ली :** महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची बातमी समोर आली आहे. आतापर्यंत बीए, बीएससी किंवा बीकॉम शिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना तीन वर्षांत पदवी मिळत असे. मात्र पुढील वर्षांपासून पदवी शिक्षण पूर्ण करण्यासाठी चार वर्षे अभ्यास करावा लागणार आहे. युजीसीने चार वर्षांच्या पदवीपूर्व अभ्यासक्रमाची रूपरेषा तयार केली आहे. येत्या शैक्षणिक वर्षात २०२३-२०२४ मध्ये सर्व देशभरातील सर्व विद्यापीठांमध्ये याची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. म्हणजेच पुढील वर्षी जे विद्यार्थी बीए, बीएस्सी किंवा बीकॉमला प्रवेश घेतील, त्यांचा अभ्यासक्रम चार वर्षांचा असणार आहे. अहवालानुसार, युजीसी पुढील आठवड्यात सर्व विद्यापीठांसह चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमाचे नियम सांगणार आहे. पदवी अभ्यासक्रमाच्या कालावधीत करण्यात आलेला बदल देशातील सर्व ४५ केंद्रीय विद्यापीठांमध्ये लागू करण्यात येणार आहे.

४ वर्षांचा अभ्यासक्रम सर्व विद्यापीठांमध्ये लागू असेल.पदवी अभ्यासक्रमाच्या कालावधीत करण्यात आलेला बदल देशातील सर्व ४५ केंद्रीय विद्यापीठांमध्ये लागू करण्यात येणार आहे. केंद्रीय विद्यापीठांसह बहुतांश राज्यस्तरीय आणि खासगी विद्यापीठात चार वर्षांचा पदवीपूर्व अभ्यासक्रम राबवणार आहेत. अहवालानुसार, देशातील अनेक डीम्ड युनिव्हर्सिटीही ते स्वीकारण्यास तयार आहेत. वर्षभराच्या पदवी अभ्यासक्रमाला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनाही चार वर्षांचा अभ्यासक्रम स्वीकारण्याची सुविधा दिली जाईल.

## धावत्या रेल्वेच्या धडकेने पंढरपूरचा विवाहित तरुण ठार

**सोलापूर :** रस्ता ओलांडत असताना वेगाने जाणाऱ्या रेल्वेच्या धडकेने २८ वर्षीय विवाहित तरुण गंभीर जखमी होऊन मरण पावला. ही घटना पंढरपूर येथील नवीन कुंभार गल्ली येथे सोमवारी रात्रीच्या सुमारास घडली. गणेश दादाराव गायकवाड (वय २८ रा. नवीन कुंभार गल्ली पंढरपूर) असे मयताचे नाव आहे.

तो काल रात्री आठ वाजेच्या सुमारास कैकाडी महाराज मठापासून पायी घराकडे निघाला होता. रूळ ओलांडत असताना रेल्वेच्या धडकेने तो दूरवर फेकला जाऊन गंभीर जखमी झाला होता. त्याला पंढरपूर येथे प्राथमिक उपचार करून मन गायकवाड (पुतण्या) यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता तो उपचारापूर्वीच मयत झाला. मयत गणेश गायकवाड हा विवाहित असून त्याच्या पश्चात पत्नी आणि २ मुले असा परिवार आहे. तो फेरी करून खेळणी विक्री करायचा व्यवसाय करीत होता. या घटनेची प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## खुनाच्या गुन्ह्यातील फरार आरोपी जेरबंद; ४ दिवसांची पोलीस कोठडी

**सोलापूर :** सोलापूर-अक्कलकोट तालुक्यातील शेगाव येथे तीन वर्षांपूर्वी घडलेल्या खून प्रकरणातील फरार आरोपी यशवंत शिवपुत्र दुधगी (रा.भतगुणगी ता. इंडि, जि.विजयपूरा) याला कर्नाटक राज्यातील त्याच्या घरातून अटक करण्यात सोलापूर ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना यश आले आहे.

यातील फिर्यादी मल्लिकार्जुन अण्णाराव पाटील (रा. शेगाव ता.अक्कलकोट) हा १८ मे २०१९ रोजी सकाळी गावातील महादेव दिंडुरे यांचे हॉटेल लगत त्यांचे इतर नातेवाईकांसोबत बोलत थांबले असताना फिर्यादीचे चुलते व त्याचे मुले सदर ठिकाणी आले व त्यांच्यात बैलपोळा या सणात मानपानावरून शिवीगाळ चालू असताना फिर्यादीचा भाऊ महादेव अण्णाराव पाटील (मयत) याचेवर अग्निशस्त्राचा वापर करून जखमी केले होते. दरम्यान याबाबत ९ जणांविरुद्ध अक्कलकोट दक्षिण पोलिसात खून आणि खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल केला होता. त्यापैकी काही आरोपींना पोलिसांनी तत्काळ अटक केली होती. तर काही आरोपी फरार झाले होते. त्यांचा वेळोवेळी शोध घेऊन सुध्दा ते मिळून येत नव्हते. सदरचे आरोपी मिळून न आल्याने याबाबत कोर्टात अहवाल सादर करण्यात आला होता. कोर्टाने गुन्हयातील पाहिजे असलेल्या आरोपींना फरार घोषित करून त्यांना तात्काळ पकडणेबाबत आदेश दिले होते.सदर गुन्हयातील फरार घोषित केलेल्या आरोपींना तात्काळ जेरबंद करण्याकामी स्थानिक ग्रामीण गुन्हे शाखेचे सहा. पोलीस निरीक्षक, अनिल सनगल्ले व त्यांचे पथक फरार आरोपींचे मागावर असताना सदर गुन्हयातील फरार असलेला आरोपी यशवंत दुधगी हा (रा. बतगुणगी. ता.इंडि जि.विजयपूरा रा. कर्नाटक) येथील त्याचे राहते घरी आला असलेबाबत खात्रीशीर बातमी मिळाली.



दरम्यान पोलिसांनी आरोपी अक्कलकोटच्या न्यायालयात हजर केले असता त्याला चार दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली आहे. गुन्ह्याचा पुढील तपास अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्याचे पोनि प्रदीप काळे हे करीत आहेत. सदरची कामगिरी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुहास जगताप यांचे नेतृत्वाखाली सहा. पोलीस निरीक्षक अनिल सनगल्ले, सहा पोलीस उपनिरीक्षक ख्वाजा मुजावर, विजया मोहिते, पोलीस अंमलदार नारायण गोलेकर, प्रकाश कारटकर, धनाजी गाडे, मोहन मनसावाले, अनिस शेख, धनराज गायकवाड, अक्षय दळवी, अक्षय डोंगरे, समीर शेख यांनी बजावली आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



तारीख पे तारीख,
तारीख पे तारीख !!!

कल्याण
268-62-345

मेन बाजार
400-40-370

## सोलापूरसह सर्व महापालिकांची नव्याने होणार प्रभाग रचना

सुराज्य/सोलापूर

**सोलापूरसह इतर सर्व महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रभाग रचना नव्याने तयार करण्याचे आदेश राज्य शासनाच्या नगरविकास विभागाने मंगळवारी काढले आहेत. नगरविकास विभागाचे उपसचिव प्रियंका कुलकर्णी–छापवाले यांनी याबाबत तयार करावी अशा सूचना सर्व आयुक्तांना दिल्या आहेत. मात्र नव्याने होणाऱ्या प्रभाग रचना किती सदस्यांची असणार याबाबत मात्र कोणताही खुलासा नसल्याने याची उत्सुकता वाढली आहे. राज्य शासनाच्या या आदेशाने महाविकास आघाडीला धक्का बसला आहे.**

२०१४ मध्ये भाजपाची सत्ता आल्यावर त्यांनी नव्याने प्रभाग रचना करत चार सदस्यीय पद्धत अवलंबली होती. याचा फायदा भाजपला झाला. बहुतांश महापालिकेवर भाजपाने सत्ता मिळवली. मात्र त्यानंतर २०१९ मध्ये सेना-राष्ट्रवादी-काँग्रेसचे महाआघाडी सरकार आल्यावर त्यांनी भाजपाने केलेली प्रभाग रचना रद्द करून नवी रचना केली आणि ३ सदस्यांचा प्रभाग झाला. मात्र ओबीसी आरक्षणामुळे ही निवडणूक वेळेत होऊ शकली नाही. त्यानंतर जूनमध्ये महाआघाडी सरकार कोसळून शिंदे- फडणवीस सरकार आले, त्याचवेळी प्रभाग रचना नव्याने होणार असा अंदाज बांधाला जात होता. अखेर मंगळवारी सोलापूरसह इतर सर्व महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रभाग रचना नव्याने तयार करण्याचे आदेश राज्य शासनाच्या नगरविकास विभागाने काढले. यामुळे आता पुन्हा एकदा नव्याने प्रभाग रचना निश्चित करण्यात येणार आहे आणि त्यानंतरच सोलापूर महापालिकेसह इतर महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक लागणार आहे. हा आदेश निघाला असला तरी प्रभाग किती सदस्यांचा असणार आहे हे मात्र स्पष्ट करण्यात आले नाही.



- **महाआघाडीला बसणार धक्का :** महाविकास आघाडीने नव्याने प्रभाग रचना करत तीन सदस्यांचा प्रभाग केला होता. आघाडीतील तिन्ही पक्षांनी आपापल्या सोयीनुसार प्रभाग रचना केल्याचा आरोप विरोधी पक्षाकडून केला जात होता. सोलापूरचा विचार करता प्रभाग रचनेवर राष्ट्रवादीचे वर्चस्व होते. त्यामुळे इच्छुकांचा ओढा पक्षाकडे वाढला होता. मात्र महाआघाडी सरकार कोसळल्याने राष्ट्रवादीला गळती लागली आहे. अशातच आता प्रभाग रचना नव्याने करण्यात येणार असल्याने राष्ट्रवादीमधून आणखी आऊट गोईंग होईल, अशी शक्यता व्यक्त होत आहे.

- **भाजपाचे राहणार वर्चस्व :** नव्याने प्रभाग रचना होणार असल्याने आता भाजपच्या कार्यकर्त्यांमध्ये आणि इच्छुकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. जूनमध्ये शिंदे आणि फडणवीस सरकार आले आहे. त्यामुळे प्रभाग रचनेवर भाजपाचे वर्चस्व राहण्याची शक्यता आहे. सोलापूर महापालिकेचा विचार करता मागिल प्रभाग रचना भाजपसाठी जरा धक्कादायक मानली जात होती. मात्र आता नव्याने होणाऱ्या प्रभाग रचनेत भाजप आपला प्रभाव दाखवण्याची शक्यता आहे.

- **चार सदस्यीय प्रभाग? :** २०१७ प्रमाणे यंदाही चार सदस्यीय प्रभाग होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. ही पद्धत भाजपासाठी लाभदायक आहे. त्यामुळे आगामी महापालिका निवडणुकीतही चार सदस्यीय प्रभाग पद्धतच होईल, असे भाजपाचे लोकप्रतिनिधी बोलत आहेत.